महाराष्ट्रातील जनतेचा आक्रोश, दैनिक नांदगांव

# आवाज

संपादक : भगवान सोनवणे

आपला व्यवसाय वृध्दिंगत होण्यासाठी दैनिक आवाजमध्ये जाहिरात करण्याची सुवर्णसंधी!

एक महिना – १४९९/– रु.
तीन महिने – २४९९/– रु.
सहा महिने – ५४९९/– रु.

✻ संपादक ✻
मो. क्र. ९५४५९ १०१७७/९२७२४ ५३९२१

RNI Reg. No.: MAHMAR/2014/66104 ■ वर्ष – ११ वे ■ अंक क्र. –१६८ ■ शुक्रवार दि. १७ जानेवारी २०२५ ■ किंमत – १ रूपया ■ पाने – ४

## नायलॉन मांजामुळे महिला पोलीस हवालदार जखमी

**दै. आवाज वृत्तसेवा...**

**मनमाड/प्रतिनिधी** –: महिला पोलीस हवालदार आपली दैनंदिन सेवा बजावून येवलाकडून मनमाडकडे येत असतांना अंकाई शिवाराात पतंगचा मांजाने गळा चिरून त्या जखमी झाल्या. रेखा फडताळे यांना मनमाड ग्रामीण रुग्णालयात प्रथमोपचार करून पुढील उपचार घेण्यासाठी नाशिक येथे हलवण्यात आले आहे.



घटनेची माहिती मिळताच डीवायएसपी बाजीराव महाजन, शहर पोलीस निरीक्षक विजय करे, पोलीस हवालदार संदीप झाल्टे, रणजित चव्हाण राजु खैरनार आदिंनी उपस्थित होऊन जखमी अवस्थेत असलेल्या रेखा फडताळे यांना पुढील उपचारासाठी पाठवण्यास सहकार्य केले.

नायलॉन मांजा म्हणजे हा इतका घातक होता की ज्या रुग्णवाहिकेतून पेशंटला नाशिकला हलवले होते त्याच्या बोनट जवळील रॉडला सुद्धा कापले गेले असल्याचे दिसुन आले होते. अंकाई जवळ लेडीज पोलीस शिपाई रेखा फडताळे पडल्या असता त्या भागातील एका मोटरसायकलस्वाराने रेखा फडताळे यांना उचलुन दुचाकीवर बसवून कमरेला बांधून तिला मनमाड शहर शासकीय रुग्णालयात घेऊन आला होता. या बद्दल मनमाड शहरातील नागरिकाकडुन कौतुक होत आहे.

दरम्यान, पोलीस हवालदार रेखा फडताळे यांचा वेळेवर उपचार झाला म्हणून त्याची प्रकृती व्यवस्थित असल्याची माहिती पोलीस हवालदार संदीप झाल्टे, रणजित चव्हाण यांनी दिली.

## वृक्ष लागवड घोटाळा प्रकरणी जिल्हाधिकारी यांच्याकडे फेर चौकशीची मागणी

**दै. आवाज वृत्तसेवा...**

**लखन वाल्हेकर, नेवासा :** नेवासा नगर पंचायतीमध्ये झालेल्या वृक्ष लागवड घोटाळा प्रकरणी जिल्हाधिकारी यांच्याकडे आज फेर चौकशीची मागणी करण्यात आली.

सविस्तर वृत्त असे की, नेवासा नगर पंचायतीकडून चौदाव्या वित्त आयोगामधून नेवासा शहरात अठ्ठेचाळीस लाख रुपये खर्चाची सुमारे अठराशे वृक्ष लागवडीची निविदा काढण्यात आली होती.सदरचे टेंडर हे ड्रॅगनफ्लाय नर्सरी ( प्रो. प्रा.ऋतुराज जोशी ) यांना देण्यात आले होते. तर प्रत्यक्षात मात्र राजकीय हस्तक्षेपातून शहरातील काहींनी हे टेंडर स्वतःकडे घेऊन ही लागवड करण्याचा फक्त बहाणा केला.वृक्ष लागवडीनंतर एक वर्ष जोपासना करून सदर वृक्ष नगरपंचायतकडे सुपूर्द करणे असे नमूद करण्यात आले होते. परंतु निविदेत नमूद वृक्ष लागवड करण्यात आलीच नाही उलट एक वर्षाच्या नंतर अठराशे वृक्ष हस्तातरण सुद्धा करण्यात आले नाही. याहीपेक्षा नगरपंचायतीने कोणतीही शहानिशा न करता लाज घेऊन सुमारे अठ्ठावीस लाख रुपयाची बिले ठेकेदारास अदा करण्यात आली.

सध्या शहरात अठराशे तर सोडा दहा वृक्ष देखील लावलेले आढळून येत नाही. नेवासा काँग्रेसने या सर्व प्रकरणाची दाखल घेत, आक्रमक भूमिका घेऊन जिल्हाधिकारी यांच्याकडे चौकशीची मागणी केली होती. सादर प्रकरणाच्या चौकशीसाठी प्रांताधिकारी सुधीर पाटील यांची नेमणूक करण्यात आली होती. सदर प्रकरणात चौकशी झाली सुनावणी देखील झाल्या. प्रकरण तालुक्यात गाजले देखील परंतु प्रशासनाने प्रशासनाला पाठीशी घालत क्लीनचिट देत मुख्याधिकारी यांना दिलासा दिला. त्यामुळे सदर प्रकरण गुलदस्त्यात टाकण्यात आले.

आज तक्रारदार महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे संभाजी माळवदे, काँग्रेस शहराध्यक्ष अंजुम पटेल यांनी जिल्हाधिकारी यांची भेट घेत सदर प्रकरणाची फेर चौकशीची मागणी केली. यावेळी जिल्हाधिकारी यांना चौकशीचे निवेदन देण्यात आले. जिल्हाधिकारी यांनी तातडीने फेर चौकशी करण्यात येईल असे स्पष्ट केले. निवेदनावेळी बसपाचे युवा नेते हरीश चक्रनारायण, कैलास बोर्डे, इलीयास शेख आदी उपस्थित होते.

*वृक्ष लागवड घोटाळ्याचा पर्दाफास केल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही. यात कितीही हस्तक्षेप केला तरी दोषी अधिकारी, ठेकेदार, यांच्याकडून काढलेल्या रकमेची वसुली करणे गरजेचे आहे. तर शहराचे वाट लावणाऱ्याणा येणाऱ्या नगरपंचायत निवडणुकीत जनता जागा दाखवून देईल – संभाजी माळवदे, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी..*

## चांदवडला नायलॉन मांजाने दोघांचे गळे चिरले, तर दोघांचे हात चिरले

**दै. आवाज वृत्तसेवा...**

**सुनिल आण्णा सोनवणे, चांदवड/प्रतिनिधी**–: चांदवड शहरात मकरसंक्रांतीच्या दिवशी पतंग उडवितांना दुचाकीने घरी जात असलेल्या २८ वर्षीय तरुणांचा गळा चिरून गंभीर जखमी झाला. त्याच्यावर खासगी दवाखान्यात उपचार सुरू असून त्याला १४ टाके पडले आहे. तर १३ व ७ वर्षीय लहान मुलांचे हात चिरले गेले. प्रशासनाच्या ढिसाळ नियोजनामुळे मकरसंक्रांतीच्या दिवशी तरुणांनी सरासपणे नायलॉन मांजाचा वापर केल्याचे दिसून आले. मकरसंक्रांती निमित्त पतंग उडविताना नायलॉन मांजाचा वापर होऊ नये यासाठी प्रशासनाने पाऊले उचली मात्र प्रशासनाचे नियम धाब्यावर ठेवीत विक्रेत्यांनी नायलॉन मांजाची छुपी विक्री केल्याचे दिसून आले. याचा प्रत्यक्ष अनुभव मकरसंक्रांतीच्या दिवशी बघावयास मिळाला. तालुक्यातील न्हनावे येथील बापू ज्ञानेश्वर ठाकरे (२८) हा युवक दुचाकीने चांदवडला कामानिमित्त आला होता. दुपारी २.३० च्या सुमारास चांदवड–मनमाड रोडने घरी जात असताना विश्राम गुहा जवळील गणुर चौफुली येथे पतंग कटुन नायलॉन




मांजा त्याच्या मानेला अडकला. मांजा धारधार असल्याने त्याचा गळा चराचर चिरला. या घटनेत बापू ठाकरे हा युवक रक्तबंबाळ झाला. त्यास नागरिकांनी उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी नेले त्यावर प्राथमिक औषधोपचार करून एका खासगी दवाखान्यात हलवण्यात आले. त्यावर तत्काळ शस्त्रक्रिया करण्यात आली तब्बल १४ टाके पडले.यावेळी त्यांच्या मानेच्या नसेपर्यन्त घाव गेला मात्र नस थोडक्यात बचावल्याने पुढील अनर्थ टळला.

या घटनेनंतर गोरख चिंधु बोरसे ( १३,चिंचवे) व अनुराग अनुकुल (७, चांदवड) यांचे नायलॉन मांजाने हात कापले गेले. त्यांच्यावर उपजिल्हा रुग्णालयात उपचार करण्यात आले. तर

शरद अशोक चव्हाण यांचा गळा कापला गेला. त्यावर उपचार करण्यात आले.

## लासलगाव सरपंचपदी सौ. योगिता पाटील विराजमान

**दै. आवाज वृत्तसेवा...**

**शरद लोहकरे, लासलगाव/प्रतिनिधी** :– माजी सरपंच जयदत्त होळकर आणि माजी जिल्हा परिषद सदस्य नानासाहेब पाटील यांच्या गटाला लासलगाव ग्रामपंचायतीवर सत्ता राखण्यास यश मिळाले आहे. सरपंच अफजल शेख यांनी राजीनामा दिल्याने लासलगाव ग्रामपंचायतीच्या रिक्त झालेल्या सरपंच पदासाठी गुरुवार दि.१६ नोव्हेंबर २०२४ रोजी संपन्न झालेल्या निवडणुकीमध्ये सौ. योगिता योगेश पाटील ह्या घवघवीत यश संपादन करून सरपंचपदी विराजमान झाल्या आहेत.





यावेळी ग्रामपंचायत सदस्य चंद्रशेखर होळकर, रोहित पाटील, रेवती होळकर, सायली पाटील, योगिता पाटील आदी ५ ग्रामपंचायत सदस्यांनी नामनिर्देशनपत्र दाखल केले होते. दुपारी १ वाजता अर्ज छाननीची प्रक्रिया सुरु झाली. यावेळी दाखल झालेले सर्व नामनिर्देशनपत्र पडताळणी करतांना कोणताही आक्षेप न आल्याने ते सर्व वैध ठरविण्यात आले. दुपारी १.३० ते २ या वेळेत अर्ज माघारीच्या कालावधीमध्ये चंद्रशेखर होळकर, रेवती होळकर आणि सायली पाटील यांनी आपले नामनिर्देशनपत्र माघारी घेतले. सरपंच पदासाठी सौ योगिता पाटील आणि रोहित पाटील या दोघांचे अर्ज शिल्लक राहिल्याने सर्वानुमते गुप्त पद्धतीने मतदान घेऊन मतदान प्रक्रिया पार पडली. यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी देवकाते यांनी उपस्थिती सर्व सदस्यांना सौ योगिता पाटील यांना आयात, रोहित पाटील यांना वर्तुळ या आणि नोटा असे तीन चिन्ह असलेली मतपत्रिका दिली होती.

यावेळी १७ पैकी १६ सदस्य उपस्थित होते यावेळी सर्व उपस्थित सदस्यांनी मतदान केले ते सर्व वैध मतदान असल्याचे निवडणूक अधिकारी भाऊसाहेब देवकाते यांनी जाहीर करून दोन्ही उमेदवारांना पडलेली मते मोजण्यात आली. या वैध मतदानामध्ये सौ योगिता पाटील यांना १६ पैकी १० तर रोहित पाटील यांना ६ मते पडल्याने निवडणूक निर्णय अधिकारी भाऊसाहेब देवकाते यांनी सौ योगिता पाटील यांना विजयी घोषित केले. यावेळी उपस्थितांनी टाळ्या वाजून विजयी उमेदवाराचे अभिनंदन केले.

यावेळी पॅनलचे प्रमुख जयदत्त होळकर, नानासाहेब पाटील यांचेसह उपसरपंच रामनाथ शेजवळ, सदस्य चंद्रशेखर होळकर, अमिता ब्रम्हेचा, अश्विनी बर्डे, सायली पाटील, रोहित पाटील, अमोल थोरे, सुवर्णा जगताप, रेवती होळकर, अफजल शेख, पुष्पा अहिरे, संगीता पाटील, संतोष पलोड, ज्योती निकम आदी सदस्य उपस्थित होते. तसेच यावेळी निवडणूक निर्णयअधिकारी म्हणून भाऊसाहेब देवकाते यांनी काम बघितले तर त्यांना तलाठी नितीन केदार, ग्रामपंचायत अधिकारी लिंगराज जंगम यांचे सहकार्य लाभले. निवडणूक प्रक्रिया पार पडत असतांना कोणत्याही प्रकारचा अनुचित प्रकार घडू नये यासाठी स.पो.नि. भास्करराव शिंदे यांनी कडेकोट बंदोबस्त ठेवला होता.

## बांध कोरल्याचा कारणावरून शिवीगाळ व हाणामारी, लासलगाव पोलीस स्टेशनमध्ये परस्परविरोधी तक्रारी दाखल

**दै. आवाज वृत्तसेवा...**

**शरद लोहकरे, लासलगाव/प्रतिनिधी :–** खेडलेझुंगे येथील सोमनाथ गिते व साईनाथ गिते या भावंडांमधील जमिनीचा बांध कोरल्याच्या कारणावरून शिवीगाळ करत भांडण होऊन परस्पर हाणामारी झालेली आहे. दि.१३ जानेवारी सकाळी ९.३० चे सुमारास घडलेल्या मारहाणीच्या घटनेतील चुलता (सोमनाथ गिते) व पुतण्या (अमोल गिते) यांनी लासलगाव पोलीस ठाण्यात परस्पर विरोधी तक्रार दाखल केलेली आहेत. सोमनाथ गिते यांनी त्यांचे भाऊ साईनाथ गिते व पुतण्या अमोल गिते आणि रवींद्र गिते यांचे विरोधात तक्रार दिली आहे. अमोल गिते यांनी त्याचे चुलते सोमनाथ गिते व चुलत भाऊ तुषार गिते यांचे विरोधी तक्रार दाखल केली आहे. खरेदी खताने खरेदी केलेल्या गट क्रमांक १४३ मधील शेत सोमनाथ व साईनाथ गिते या भावंडांनी बांध घालत आपापसात निम्मी निम्मी वाटून घेतलेली आहे. त्यांच्यात दिनांक १३ रोजी शेतातील बांधावरून शाब्दिक बाचाबाची झाली होती. या भांडणामध्ये दोन्ही कुटुंबातील सदस्यांचा सहभाग होता. दोन्ही कुटुंबामध्ये परस्परांवर शिवीगाळ होऊन हाणामारी झाली. सोमनाथ गिते यांनी भाऊ व पुतण्याच्या विरोधात दिलेल्या फिर्यादीनुसार बांध कोरल्याचा जाब विचारला असता भाऊ साईनाथ गिते, पुतण्या रवींद्र गिते व अमोल गिते या सर्वांनी सोमनाथ गिते व त्यांची पत्नी संगिता गिते हिस शिवीगाळ व लाथा बुक्क्यांनी मारहाण करत दमदाटी केली. अमोल गिते याने हातातील फावड्याने चुलते सोमनाथ गिते यांना उजव्या हातचे करंगळीजवळ मारहाण करून दुखापत केली. याच घटनेसंदर्भात सोमनाथ गिते यांनी भाऊ साईनाथ गिते व पुतणे अमोल गिते आणि रविंद्र गिते याच्या विरोधात तक्रार दाखल केली आहे. (पान २ वर)